पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २४/४/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ७६**

सह महापालिका आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र. ४) कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे मार्च २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांचे जा.क्र. सह मआ–४/७३ दि.१०/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ७७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/३/२०१८ ते दि.२८/३/२०१८ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. मआ/उआप–३/१२६ दि.१७/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ७८**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चा माहे मार्च २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/१२६ दि.१२/४/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७९**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.योगेश ससाणे यांचे दि. १०/४/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेतील नगरसचिव कार्यालयाकडे यापूर्वी अनेक वर्षापासून ज्या सेवकांची नेमणूक करण्यात आलेली होती त्या सेवकांना सेवानिवृत्ती पर्यंत त्याच खात्यामध्ये काम करावे लागत असे .

पुणे महानगरपालिके व्यतिरिक्त महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेतील नगरसचिव कार्यालय हे मा.महापालिका आयुक्त यांच्या अधिपत्याखाली काम करीत असून त्याठिकाणी कार्यरत असलेल्या सेवकांच्या बदल्या महाराष्ट्र मनपा अधिनियमानुसार किमान दर तीन वर्षानंतर होत आहेत.परंतू पुणे महानगरपालिकेमध्ये या नियमाची अंमलबजावणी होत नाही. महानगरपालिकेतील विविध खात्याकडे काम करणाऱ्या सेवकांची नगरसचिव कार्यालयाकडे बदली झाल्यास नगरसचिव कार्यालयाच्या कारभारामध्ये गती निर्माण होण्यास मदत होत असते. पुणे मनपा नगरसचिव कार्यालयाकडील बहुतांशी कर्मचारी गेली अनेक वर्षांपासून हे एकाच खात्यामध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेतील नगरसचिव कार्यालयामध्ये अन्य खात्यातील सेवकांची बदली झाल्यास कार्यालयीन कामामध्ये गती निर्माण होण्यास मदत होईल . पुणे मनपा नगरसचिव कार्यालयाकडे सध्या अनेक पदांच्या जागा रिक्त असल्याने महापालिका आयुक्त यांच्या अधिपत्याखालील अन्य खात्यातील सेवकांकडून कामकाजामध्ये मदत घेतली जात आहे.

तरी यापुढे पुणे मनपा नगरसचिव कार्यालयाकडील ज्या सेवकांची जास्तीत जास्त तीन वर्षे सेवा झाली असेल त्या सेवकांची मा. महा. आयुक्त यांच्या अधिपत्याखालील अन्य खात्याकडे त्वरीत बदली करावी व अन्य खात्यातील सेवकांची नगरसचिव कार्यालयाकडील रिक्त जागेवर नेमणूक करण्यात यावी.

**विषय क्र. ८०**

मा.संजय (तात्या) घुले यांचे दि. १७/४/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २६ ड मध्ये विविध ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. सीई२०अे१०२/एसए२-१४६०, प्रभाग क्र.२६ ड पारगेनगर परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २६ ड मध्ये विविध ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणे | --- | १० लाख |

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ८१**

कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत महापालिका सेवकांना एक अपत्यावर कुटूंब नियोजन केल्या प्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणे ऐवजी रोख रक्कम स्वरुपात एकदाच बक्षिस (One time reward) देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/१०४७ दि.२०/२/२०१८ चे पत्र.

१)मा.महापालिका सभेचे ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार संबंधित महानगरपालिका अधिकारी/सेवकांना देण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करणेस, त्यानुसार वेतन फेरनिश्चितीकरण व आवश्यक ती कार्यवाही करणेस

२) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे मा.स्थायी समितीचे मंजुरीने लाडकी लेक दत्तक योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये एका मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास र.रुपये ५० हजार पर्यंत राष्ट्रीयकृत बँकेत मुलीच्या नावे गुंतविण्यात येतात. त्या योजनेप्रमाणे कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत पुणे महापालिका अधिकारी/सेवकांनी एका अपत्यावर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याप्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणेऐवजी, संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना र.रुपये ५० हजार एकदाच बक्षिस (One time reward) स्वरुपात दि. १८/१२/१९९८ पासून मा.महापालिका सभा ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ चे मंजुरीमधील अट क्र. २ व ४ च्या अधीन देणेस

(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि.२०/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८२**

अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या वर्ग १ ते ४ संवर्गातील सर्व पदांवरील म.न.पा. सेवकांचे वेतनामधून मासिक सी.एच.एस.वर्गणी(मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनामधून मासिक सी.एच.एस. वर्गणी (मूळ निवृत्ती वेतन+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस, व त्यानुसार कार्यवाही करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९७४ दि.५/२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८३**

शहरी गरीब वैद्यकीय सहाय योने अंतर्गत पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटलीमधील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी ,सी.जी.एस.मान्य दराने,५०% हमी पत्रांतर्गत रक्कम रुपये एक लाख या कमाल मर्यादिऐवजी १००% वाढीने रक्कम रुपये दोन लाख या कमाल मर्यादिपर्यंत आर्थिक लाभ मिळणेसाठी चालू आर्थिक वर्षातील शहरी गरीब वैदयकीय सहाय योजनेसाठी मान्य तरतूद रक्कम रुपये २५,००,००,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये पंचवीस कोटी फक्त) असून (१) सदयस्थितीत योजने अंतर्गत सभासदत्व घेण्यासाठी प्रतिवर्षी वाढत जाणारी लाभार्थींची संख्या (२) एका आर्थिक वर्षात कुटूंबातील एका सदस्यास अथवा एका पेक्षा जास्त सदस्यांस मिळून रक्कम रुपये १,००,०००/- पेक्षा जास्त होणारा वैदयकीय उपचार औषधोपचारांचा खर्च (३) रुग्णांचे गंभीर आजारांवरील प्रदीर्घ कालावधी साठी चालू असलेल खर्चीक वैदयकीय उपचार व महागडया औषधोपचारांची रक्कम हॉस्पिटल प्रशासनास अदा करणेसाठी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांची असमर्थता या सर्व कारणांस्तव पुढील आर्थिक वर्षापासून सदर योजनेच्या तरतूदीमध्ये प्रमाणबध्द अथवा दुपटीने वाढ केल्यासच योजनेच्या प्रत्येक सभासद कुटूंबांना, एका आर्थिक वर्षासाठी, पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्स मधील अंर्तरुग्ण विभागातील वैदयकीय उपचारांसाठी सी.जी.एच.एस.मान्य दराने ५०% हमी पत्रांतर्गत रक्कम रुपये १,००,०००/-(अक्षरी-रक्कम रुपये एक लाख) या कमाल मर्यादि ऐवजी रक्कम रुपये २,००,०००/-(अक्षरी-रक्कम रुपये दोन लाख) या कमाल मर्यादिपर्यंत आर्थिक लाभ देण्याबाबत मा. योगेश समेळ व मा.संदिप जऱ्हाड

यांचे दि.२१.११.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१५२,दि. २२.११.२०१७ ला अनुसरुन मा.प्र.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/ आरोग्य/ ११४७, दि.७.३.२०१८ ने पाठविलेला अभिप्रायास अनुसरुन झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.२१४, दि. १७/३/२०१८ चा विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८४**

पुणे महानगरपालिके तर्फे समाज विकास विभागा मार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत तरी सन २०१७–१८ या आर्थिक वर्षापासून इ.१० वी साठी शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट र.रुपये ५०००/– इतके अनुदान देण्याबाबत मा .सौ. राणी रायबा भोसले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती व मा.सौ.मुक्ता जगताप यांचे दि.१०.१.२०१८ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १६९ दि.१०/१/२०१८ ला अनुसरुन झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २००९ दि.२३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/सविवि/१३९७ दि.३१/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१०/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८५**

पुणे शहरातील मुख्य रस्त्याजवळील महत्वाच्या ११ ठिकाणी ईटॉयलेट उभारणे हे काम इराम सायंटीफीक–सोल्यूशन्स प्रा.लि. या कंपनीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण २(२) अन्वये काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१३९१ दि.३१/३/२०१८ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण २(२) अन्वये इराम सायंटीफीक–सोल्यूशन्स प्रा.लि. या प्रस्तावास मान्यता मिळणेस व त्यानुसार १४ ई–टॉयलेट ११ ठिकाणी बसविण्याचा तसेच एक वर्ष विनामोबदला देखभाल करणेसाठी र.रुपये १,९९,१३,६००/– पर्यंत खर्च करणेस

२) सदर ई–टॉयलेटसाठी लागणारा खर्च हा पुणे खासदार फंडातून उपलब्ध करुन घेणेस तसेच इराम सायंटीफीक–सोल्यूशन्स प्रा.लि. व पुणे महानगरपालिका यांचेमध्ये करारनामा करणेस व बिल अदा करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१७/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ८६**

सोमनाथ नगर या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कुमारी. वैष्णवी विजय जगधणे,वय १८ वर्षे ही मुलगी क्रीडा क्षेत्रातील कराटे हा खेळ खेळत असून, तिला राज्यस्तरीय, राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर या क्रीडा प्रकारामध्ये सुवर्ण पदक, व रौप्य पदक याचबरोबर अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. सदर खेळाडू गरीब घरातील असल्याने या पुढे होणा–या सर्व स्पर्धेसाठी तिचा लागणारा खर्च हा पुणे महानगरपालिकेने करावा. तसेच महानगरपालिके कडून कुमारी. वैष्णवी विजय जगधणे हिचा यथोचित सन्मान करण्यात यावा. जेणे करून इतर सर्व खेळाडूंना याची प्रोत्साहन व प्रेरणा मिळेल आणि पुणे शहराच्या लैकिकात भर घालण्यात या खेळाडूला मदत देण्यास मान्यता मिळणेबाबत मा. सौ.श्वेता खोसे – गलांडे यांचे दि. २०/०२/२०१८ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. ३९ दि.८/३/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. ८७**

सदाशिव पेठ येथे राहणारी कुमारी गायत्री प्रदीप जाधव इयत्ता १० वी, वय १६ वर्षे हिची केरळ येथे रायफल शुटींग खेळाची राष्ट्रीय स्तरावरची स्पर्धा झाली. तरी या विद्यार्थिनीला लागणारा खर्च महानगरपालिकेने करावा ही विनंती. जेणेकरून इतर सर्व खेळाडूंना प्रोत्साहन व प्रेरणा मिळण्याकरीता मा.श्री. धीरज रामचंद्र घाटे यांचे दि. २१/०२/२०१८ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. ४० दि.८/३/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. ८८**

प्रभाग क्र. २५ वानवडी येथील एस. आर. पी. एफ. ग्रुप क्र. १ मधील कार्यरत पोलीस कर्मचारी श्री. राजेश पवार यांची मुलगी जाई राजेश पवार ही एक उत्तम खेळाडू (नेमबाझ) असून १० मीटर एअर रायफल शुटींग या प्रकारामध्ये नेमबाझी करते. आत्तापर्यंत या खेळात अनेक पारितोषिके तिला मिळालेली आहेत.

मिळालेली पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. | ६१$^{st}$ नॅशनल स्कुल गेम्स इंदौर (मध्यप्रदेश) २०१५-२०१६ | गोल्ड |
| २. | कुमार सुरेंद्रसिंग ईंटरस्कुल शुटींग चॅम्पीयनशीप दिल्ली २०१५ | ब्रॉन्झ |
| ३. | ६२$^{nd}$ महाराष्ट्र स्टेट शुटींग चॅम्पीयनशीप मुंबई २०१७ | ८$^{th}$ रँक |
| ४. | ईंटर स्कुल स्टेट चँम्पीयनशीप आमरावती २०१५ | ब्रॉन्झ |
| ५. | महापौर चषक पुणे २०१५-१६ | सिल्व्हर |
| ६. | वेस्ट झोन शुटींग चॅम्पीयनशीप मुंबई २०१५ | ब्रॉन्झ |
| ७. | ईंटर कॉलीगेट चॅम्पीयनशीप कॉम्पीटीशन पुणे २०१७ | गोल्ड |
| ८. | ऑल ईंडिया ईंटर युनिवर्सिटी चॅम्पीयनशीप अमृतसर (पंजाब) २०१७ | ४$^{th}$ रँक |

असे अनेक पारितोषिके जाईने मिळविले आहेत व आपल्या पुणे शहराचे नाव तिने रोषन केलेले असून पुढेही करत राहील असा आमचा विश्वास आहे. सदर खेळाडूला पुढील सरावा करीता लागणारी साहित्य आधुनिक एअर रायफल व इतर लागणारे साहित्य अतिशय महागडे असून तिला व तिच्या कुटुंबाला ते न परवडणारे आहे. आर्थिक परिस्थितीमुळे अश्या उत्तम खेळाडूची ग्रोथ, प्रगती थांबणे ही क्रीडा क्षेत्रासाठी फार दु:खद गोष्ट आहे.

तरी सदर खेळाडू जाई राजेश पवार हिला पुढील वाटचालीसाठी लागणा-या साहित्याकरीता पुणे महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत मिळावी ही विनंती. साहित्या करीता लागणारा अंदाजे खर्च :- (रू. ३ लक्ष) त्यास मान्यता मिळणेबाबत मा.श्री. धनराज घोगरे व मा. श्री. सम्राट थोरात यांचे दि. २३/०२/२०१८ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. ४१ दि.८/३/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. ८९**

कु.प्रदिप दिवाणसिंग जाधव, रा.शिवलक्ष्मी अपार्ट, फ्लॅट नं.१, कस्तुरे चौक,रविवार पेठ,पुणे-२ हा कीक बॉक्सिंग खेळाडू असून, त्याची इंडोनेशिया एशियन गेम्स येथे खेळल्या जाणा-या कीक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. परंतु त्याची घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्याला इंडोनेशिया येथे खेळावयास जाणे अत्यंत अडचणीचे आहे.

तरी कु. प्रदिप दिवाणसिंग जाधव याला पुणे महानगरपालिकेतर्फे र.रू.२ लाखाची आर्थिक मदत देण्यास मान्यता मिळणेबाबत मा. सिध्दार्थ शिरोळे यांचे दि. १७/०३/२०१८ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. ४३ दि.८/३/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. ९०**

पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता मे.सत्यम कन्सल्टंटस यांचे नाव मा.स्थायी समिती ठराव क्र. १६०४ दि. ११/१२/२०१२ अन्वये मान्य असलेल्या सल्लागार यांचे यादीत तज्ञ सल्लागारांच्या पॅनेल वर्ग (I)(प्रोजेक्ट र.रुपये ०.० ते ५.०० कोटीपर्यंत) समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३ दि.१३/४/२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**